श्रीसंत सेवालाल महाराज, पोहरादेवी, ता. मानोरा, जि. वाशिम या तीर्थक्षेत्राच्या अतिरिक्त विकास आराखड्यास मान्यता देणेबाबत .

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१९/प्र.क्र.४१/योजना-६

बांधकाम भवन, २५ मर्झबान मार्ग,

फोर्ट, मुंबई-४०० ००१

दिनांक: ८ मार्च, २०१९.

**वाचा :-**

१) जिल्हाधिकारी, वाशिम यांचे पत्र जा.क्र. नियोजन/कक्ष -१५/संस/३१३/१९, दि. २१ जानेवारी, २०१९ अन्वये सादर केलेला प्रस्ताव.

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दिनांक ४ जून २०१५

३) मा. मुख्यसचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

४) मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीच्या दि. ५ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

५) शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१७/प्र.क्र.७८/योजना-६, दि. २२ नोव्हेंबर, २०१७.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये श्रीसंत सेवालाल महाराज, पोहरादेवी, ता.मानोरा, जि.वाशिम या तीर्थक्षेत्राच्या आराखडयातील एकूण रू.२५.०० कोटी इतक्या किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून रु.५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तदनंतर जिल्हाधिकारी, वाशिम यांनी जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने सदर तीर्थक्षेत्राचा अतिरिक्त रु. १००.०० कोटी इतक्या रकमेचा विकास आराखडा शासन मान्यतेसाठी सादर केला होता.

२. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का-१४४४, दिनांक ४ जून २०१५ मधील तरतूदींनुसार सदर आराखडयातील एकूण रु. ७५.०० कोटी इतक्या किंमतीच्या कामांच्या प्रस्तावास व खर्चास मा . मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने २१ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली. तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीने दि. ५ मार्च, २०१९ रोजीच्या बैठकीत वरीलप्रमाणे सदर आराखड्यातील एकूण रु. ७५.०० कोटी किंमतीच्या कामांच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे .

त्यानुसार सदर आराखडयातील रु. ७५.०० कोटी एवढया अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

**शासन निर्णय :-**

जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सादर केलेल्या व राज्यस्तरीय समित्यांनी मान्यता दिलेल्या श्रीसंत सेवालाल महाराज, पोहरादेवी, ता.मानोरा, जि. वाशिम या तीर्थक्षेत्रास यापूर्वी रु . २५.०० कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून आता अतिरिक्त विकास आराखड्यातील एकूण रु.७५.०० कोटी (रुपये पंच्याहत्तर कोटी ) इतक्या निधीच्या खालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

| अ. क्र. | मूळ प्रशासकीय मान्यता दिलेले कामाचे नांव | मूळ प्रशासकीय मान्यता (रुपये कोटीत) | अतिरिक्त प्रस्तावातील कामे | नव्याने अतिरिक्त प्रस्तावासाठी अंदाजपत्रकीय किंमत (रुपये कोटीत) | नव्याने अतिरिक्त प्रस्तावासाठी प्रशासकीय मान्यता (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | भक्त निवास इमारतीचे बांधकाम करणे. (8 Guest Rooms, 1 Dormitory and Admin Block, Police Chowki, Open Hall & L&G Toilets ) सौर उर्जा यंत्रणेसह. | १.४०३३ | प्रदर्शन केंद्राचे परिसरात वाढीव **६४** रूम फर्नीचर व ईतर सुविधांसह **+ २** डारमेटरी **(Dormitory)** प्रसाधन गृहासह व ग्रीन बिल्डींग संकल्पनेसाठी व Admin Block, Police Chowki, Open Hall & L&G Toilets | ११.०० | ६.०० |
| २. | प्रवेशद्वार व आवार भिंतीचे बांधकाम करणे. (Compound Wall 876 m. And Entrance Gate) | ०.२८५७ | **९७०** मी. परकोट व त्यावरील परिक्रमा मार्ग व **३** भव्य प्रवेशद्वार | ३.५० | ३.५० |
| ३. | प्रदर्शन केंद्राचे बांधकाम करणे. (Museum Building Area=30000SFFT.) | ८.८४१० | प्रदर्शन केंद्राचे बांधकाम करणे (११५००० चौ फूट) व **२६** मी. उंचीचे | २०.०० | १०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सौर उर्जा यंत्रणेसह. | | | | |
| ४. | अंतर्गत रस्ते बांधकाम करणे. (Walkway) | ०.८३५४ | अंतर्गत रस्ते **(With White Topping)** | ०.८० | ०.८० |
| ५. | बगीचा,तांडा व जमीन सुशोभीकरण करणे. (Landscaping Area Trees Instant Lawn 968 SQFT.) | ०.८००० | पेव्हींग ब्लॉक, गार्डन, लँड स्केपिंग, ट्रेडीशनल व्हिलेज (बंजारा व्हिलेज) | १.५० | १.५० |
| ६. | वाहतनतळ व्यवस्था करणे. (Paving & Parking) | ०.१२५० | वाहन तळ व्यवस्था (With White Topping) | ०.६० | ०.६० |
| ७. | खुले सभागृहाचे बांधकाम करणे. | १.६०७७ | ओपन डारमेटरी ४ नग ४००० भक्तांसाठी राहण्याची व्यवस्था प्रसाधन ग्रुहासह | २.५० | २.५० |
| ८. | सार्वजनिक प्रसाधनगृह बांधणे | ०.२००० | सार्वजनिक प्रसाधनगृहे **(100 Toilets & 50 Bath Rooms)** पाण्याचे टाकीसह व सेप्टीक टाकीसह . | २.५० | २.५० |
| ९. | पोलिस चौकी बांधणे | ०.०५०० | -- | ०० | ०० |
| १०. | झाडे लावणे व संवर्धन करणे (Tree & Plantation) | ०० | ५००० झाडे लावणे तारेचे कुंपणासह व ५ वर्षे निगराणीसह **(Tree Plantation)** | १.५० | १.५० |
| | **एकूण किंमत (अ)** | **१४.१४८१** | | **४३.९०** | **२८.९०** |
| **ब)** १ | विद्युतीकरणासाठी तरतूद: | | अंतर्गत व बाहय विद्युतीकरण, उद्वाहन, हायमास्ट, रोहीत्र संच , फायर फाईटींग, पथदिवे, साऊंड सिस्टीम, लाईटींग, लँड स्केप लाईटींग, वॉटरपंप, वातानुकलीन यंत्रणा, सी.सी. टिव्ही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व्यवस्था. | | |
| | अ) बाहयविद्युतीकरण | ०.७०७४ | | ९.०० | ९.०० |
| | ब) अंतर्गत विद्युतीकरण | १.५५६३ | | | |
| | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | ०.६२०० | | ०० | ०० |
| २ | पाणीपुरवठा व मल निस्सारण व्यवस्था. | १.४१४८ | पाणी पुरवठा व मलनिस्तारण व्यवस्था ही बाब वरील क-१ व क -२ मध्ये अंतर्भुत आहे. | ०० | ०० |
| ३ | अंतर्गत सजावटीकरण करणे. | १.४१४८ | प्रदर्शन केंद्र इमारतीसाठी अंतर्गत सजावट, अकॉस्टीक्स, फर्निचर, डिजीटल डिस्प्ले इत्यादी. | १५.५४ | ५.५४ |
| | **एकूण किंमत (ब)** | **५.७१३३** | | **२४.५४** | **१४.५४** |
| **क)** १ | पाणी पुरवठा टाकी ,पंप घर इत्यादी बांधकामे करणे | ०.३००० | पाणी पुरवठा टाकी, ईत्यादि बांधकामे करणे | ५.०० | ५.०० |
| २ | सांडपाणी शुध्दीकरण केंद्र व घनकचरा व्यवस्थापन करणे. | ०.३००० | मलनिस्तारण व्यवस्था (STP) | २.०० | २.०० |
| ३ | पाणी पुनर्भरण व्यवस्था करणे. | ०.०५०० | रेन वॉटर हार्वेस्टींग, | ०.५० | ०.५० |
| ४ | वातानुकूलित यंत्रणा बसविणे. | ०.३००० | वातानुकुलीत यंत्रणा बसविणे ही बाब वरील ब -१ मध्ये अंतर्भुत आहे . | ०० | ०० |
| ५ | सोलर सिस्टीम बसविणे | ०.०० | प्रदर्शन केंद्राचे परिसरात सोलर सिस्टीम यंत्रणा बसविणे | ४.०० | ४.०० |
| ५ | मंदिर/यात्रापरिसरात जनसुविधा केंद्र व | ०.१५०० | मंदिर/यात्रा परीसरात जनसुविधा केंद्र व फिरते | ०.६० | ०.६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | फिरते प्रसाधन गृहाची व्यवस्था करणे. | | प्रसाधन गहाची व्यवस्था करणे | | |
| ६ | वास्तुविशारद सेवा शुल्क (३.००%-अ+ब साठी) | ०.६३८२ | वास्तुविशारद सेवा शुल्क **(३.००%**-अ+ब-**३** साठी**+१२% GST)** | २.०० | २.०० |
| | **एकूण किंमत (क)** | **१.७३८२** | | **१४.१०** | **१४.१०** |
| **ड)** १ | चाचणी अहवाल खर्च (१.५० %) | ०.२१२२ | चाचणी अहवाल खर्च (१.५० %) | ०.६६ | ०.६६ |
| २ | विमा खर्च(१.००%) | ०.१४१५ | विमा खर्च(१.००%) | ०.८३ | ०.८३ |
| ३ | आकस्मिक खर्च(४%) | ०.५६५९ | आकस्मिक खर्च(४%) | ३.३० | ३.३० |
| ४ | सेंटेज खर्च(५%) | १.०६३८ | सेंटेज खर्च(५%) | ३.४२ | ३.४२ |
| ५ | G.S.T. | ०.०० | G.S.T. | ८.२१ | ८.२१ |
| ६ | भाव दरवाढ व वास्तूशास्त्रीय प्रक्रियासाठी तरतूद | १.४१५० | भाववाढ साठी | १.०४ | १.०४ |
| | **एकूण किंमत (ड)** | **३.३९८४** | | १७.४६ | १७.४६ |
| | **एकुण अंदाजित किंमत (अ+ब+क+ड)** | **२४.९९८०** | | **१००.००** | **७५.००** |

**३.** वरीलप्रमाणे सादर केलेल्या अतिरिक्त प्रस्तावातील एकूण रु. १००.०० कोटी निधीपैकी रु. ७५.०० कोटी निधीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तथापि, या रु. ७५.०० कोटी अतिरिक्त निधी करिता व तीर्थक्षेत्राकरिता स्वतंत्र उपलेखाशीर्ष कार्यान्वित केले जाईल व उपलब्ध निधीनुसार सदर प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करण्यात येईल.

४. तसेच सदर कामांच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मंजूरी (Sanctioned) असल्याची व बांधकामासाठी लागणारी आवश्यक जागा ग्रामपंचायत/जिल्हा परिषद मालकीची आहे याची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीने खात्री करून पुढील कार्यवाही करावी.

५.	याबाबत प्राप्त होणाऱ्या निधीकरिता जिल्हा नियोजन अधिकारी/ सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, वाशिम यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे . तसेच जिल्हाधिकारी , वाशिम यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६.	सदर कामांचे नियोजन व खर्चाचे सनियंत्रण, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दिनांक ४ जुन २०१५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समिती व जिल्हास्तरीय कार्यकारी समिती यांनी प्रकल्पाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

७.	सदर कामांची देखभाल दुरुस्ती देवस्थान ट्रस्ट यांनी करावी. बांधकामाच्या कामाची रचना (Design) ही देखभाल दुरुस्तीसाठी कमीत-कमी (Low Maintenance Cost) खर्च करणारी असावी. त्याचप्रमाणे सांडपाणी, घनकचरा, इतर कचरा इ. बाबतची कोणतीही अस्वच्छता होणार नाही, याबाबत संस्थानने व सर्व संबंधितानी विशेष दक्षता घ्यावी .

८. याप्रकरणी वित्तीय मान्यता व निधी वितरणाबाबत स्वतंत्र उपशीर्ष निर्माण केल्यानंतर स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.

९.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१९५०२२०६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.03.11 12:40:56 +05'30'

**(मनोज जाधव)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.).यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंबई
१२. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती.
१३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
१५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ,वाशिम
१६. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, वाशिम
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम
१८. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१९. वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
२०.कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास विभाग
२१.निवड नस्ती (का.यो-६). ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.